प्रकरण १ ले

# साहित्याचे स्वरूप

प्राचीन काळी साहित्याला 'काव्य' असे संबोधले जात असे. काव्य म्हणजे केवळ पद्यमय काव्यरचना नव्हे तर गद्य-पद्य मिश्रीत वाङ्मयाचा समावेश काव्यात केला जात होता. म्हणून साहित्य ही संकल्पना खूप व्यापक आणि विशाल स्वरुपाची आहे. वास्तविक पाहता साहित्य म्हणजे सामग्री, असेही म्हटले जाते. ज्याप्रमाणे आपण दैनंदिन व्यवहारात शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य, शेतीविषय साहित्य असे साहित्याचे व्यापकत्व लक्षात घेतो. यावरून असे लक्षात आले की, आपण ज्या साहित्य प्रकाराचा अभ्यास करणार आहेत. त्या साहित्याला कोणते साहित्य संबोधायचे, असे म्हटले जाते की, जे जे वाणीमय ते ते वाङ्मय आणि जे जे लिखित ते ते साहित्य अशी साहित्याची ढोबळमानाने व्याख्या केली जाते. परंतु साहित्य हे विशाल आहे. ते अभ्यासाकरीता सोपे जावे म्हणून साहित्याचे दोन प्रकार मानले जातात. १) ललित वाङ्मय, २)ललितेत्तर वाङ्मय. आपण या ठिकाणी ललित वाङ्मयाच्या स्वरूपाचा अभ्यास करणार आहोत. याचाच अर्थ ललित वाङ्मय किंबहुना काव्य म्हणजे काय? व त्याचे स्वरूप. याचा आढावा पुढीलप्रमाणे :

प्राचीन मीमांसकांनी केलेल्या काव्याच्या व्याख्या :

१) भामह : ''शब्दार्थो संहितो काव्यम् ॥''

(शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य होय.)

२) रुद्रट : ''ननु शब्दार्थो काव्यम् ॥''

(खरोखरच शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्य होय.)

३) दण्डी : ''शरीर तावदिष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ॥''



Scanned with OKEN Scanner

## आधुनिकांनी केलेली काव्याची व्याख्या : / पाश्चात्य मीमांसक :

१) कोलरिज : "The best words in best order."

(उत्तम क्रमात योजलेले उत्तम शब्द म्हणजे काव्य होय.)

२) वर्डस्वर्थ : "The spontaneous overflow of powerful feeling."

(भावनेचा सहजोद्रेक म्हणजे काव्य होय.)

३) हॅजलिट:"The Language of the imagination and the passions."

(कल्पना आणि भावनोत्कटता याची भाषा म्हणजे काव्य होय.)

४) एडगर ॲलन पी. : The rythemic creation of beauty.

(सौंदर्याची लयबध्द निर्मिती म्हणजे काव्य होय.)

५) अर्नाल्ड : "The most delight ful and perfect form of utter-ance that human words can reach."

(मानवी शब्दांच्या झेपेची अत्युच्च शक्यता दाखविणारे अतिशय रमणीय आणि परिपूर्ण, असे उच्चारित रूप होय.)

पाश्चात्य साहित्य मीमांसकांनी आपल्या व्याख्येत सौंदर्यालाच महत्त्वाचे स्थान दिल्याचे जाणवते. त्यांच्या व्याख्या अभ्यासल्यानंतर असे जाणवते की, 'सौादर्य हेच ललित वाङ्मयाचे प्राणभूत तत्त्व आहे.' त्याचबरोबर त्यांनी केवळ भावनेला महत्त्व दिले नाही. तर भावनेच्या आविष्काराला महत्त्व दिल्याचे जाणवते. विशिष्ट भावना जागृतीमुळे कवीच्या अंत:करणात ही प्रतिमा तयार होते. त्या कल्पनात्मक प्रक्रियेला जेंव्हा सौंदर्यपूर्ण आकार लाभतो. त्याची अभिव्यक्ती म्हणजे काव्य होय.

सुप्रसिध्द काव्यमीमांसक डॉ. ए. सी. ब्रॅडले काव्याबद्दल असे म्हणतात की, काव्याचा आशय म्हणजे काव्यस्वरूपी आत्मा आणि त्याचा अविष्कार म्हणजे रीतीरुपी शरीरसौष्ठव अशी विभागणी करणे, कसे चुकीचे आहे. हे अत्यंत मार्मिकपणे दाखविले



Scanned with OKEN Scanner

आहे. आत्मा आणि अविष्कार या भिन्न आणि स्वतंत्र वस्तुंमध्ये मनुष्याचे म… नसून आत्म्याला सगुण साकार आविष्कारात करणे आहे. तसेच काव्याचे का… स्वतंत्रपणे आशयात म्हणजेच भावनेत अगर आविष्कारात नसून ते भावनेच्या आविष्का… असते.''[११]

**ललित वाङ्मयाचे स्वरूप :**

ललित वाङ्मयाचे स्वरूप हे विविधतेने नटलेले आहे. ललित वाङ्मय अनेक गुणांनीयुक्त असते. ते ललितेत्तर साहित्यापेक्षा वेगळे असते. हे काव्या… स्वरूपावरूनच लक्षाते येते. म्हणून शास्त्र आणि ललित वाङ्मय यांत कोणता फ… आहे. हे पहिल्यांदा लक्षात घेऊ. म्हणजेच ललित वाङ्मयाचे वेगळेपण लक्षात येई…

**ललित वाङ्मय आणि ललितेत्तर वाङ्मय फरक :**

साहित्यामध्ये शब्दार्थाला महत्त्वाचे स्थान असते. सर्वच साहित्यात म्हणजे इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र आणि भाषाविषय यामध्ये शब्दार्थ असतात. पर… शास्त्रातील शब्दांपेक्षा वाङ्मयातील शब्दांना एक वेगळेपण प्राप्त होते. म्हणून साहित्या… ललित वाङ्मय आणि ललितेत्तर वाङ्मय असे दोन प्रकार कल्पिले जातात. ललितेत्तर साहित्यालाच शास्त्रीय असे म्हटले जाते.

ज्या वाङ्मयात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र आदि वाङ्मय प्रकारांचा अभ्यास केला जातो. त्यास ललित वाङ्मय असे म्हणतात. जे वाङ्मय लालित्यपूर्ण, सौंदर्यपूर्ण असते त्यास ललित वाङ्मय असे म्हणतात. शास्त्रीय वाङ्मयात सौंदर्याला गौण स्थान असते.

ललित वाङ्मयाचा कर्ता हा जीवंत असतो तो ज्ञात असतो. परंतु शास्त्रीय वाङ्मयाचा कर्ता हा अज्ञात असतो. जसे शास्त्रातील एखाद्या गोष्टीचा शोध कोणी लावला असे विचारले असता ते सांगता येत नाही. परंतु 'फुलराणी' असे उच्चारताच

आपल्याला बालकवींची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. कारण 'फुलराणी' कवितेत बालकवीचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. म्हणून ललित वाङ्मयाचा कर्ता हा आपल्याला माहित असतो. परंतु शास्त्रीय वाङ्मयाला कर्त्याबद्दल निश्चित अशी माहिती नसते.

प्रा. वा.ल. कुलकर्णी या सुप्रसिध्द समीक्षकाने साहित्याचे स्वरूप स्पष्ट करताना ललित आणि ललितेत्तर साहित्याचे वेगळेपण नेमकेपणाने टिपले आहेत. त्यांच्या मते, 'ललित साहित्य' मूलतः व्यक्तिनिष्ठ, भावप्ररित, कल्पना, प्रतिभानिर्मित, सौंदर्यसिध्दीच्या नियमाचे अनुसरण करणारे, वैशिष्टयपूर्ण सुसंघटन असणारे आणि ज्यांच्या आशयाची नेमकी अटकळ बांधता येत नाही, असे आहे. तर ललितेत्तर साहित्य हे मूलतः वस्तुनिष्ठ बुध्दिप्रेरित, तर्क-अनुमान आदिंवर भर देणारे म्हणून तर्काधिष्ठित सुसंघटन असणारे, आविष्काराबाबत एक ठराविक साचा असणारे आणि ज्याची अटकळ बांधता येईल. अशी आशयरूपी सिध्दातांची अवस्थांतरे असणारे असे आहे.[२] वरील वा. ल. कुलकर्णी यांच्या मतानुसार ललित वाङ्मय हे ललितेत्तर वाङ्मयापेक्षा कसे वेगळे आहे, हे स्पष्ट होते. ललित वाङ्मय हे व्यक्तिनिष्ठ असते. म्हणजे ती कलाकृती एका लेखकांची निर्मिती असते. लेखक दैनंदिन व्यवहारात जे जीवन जगतो. अनुभवतो तो अनुभव कल्पनेच्या सहाय्याने साहित्यात प्रतिबिंबित करीत असतो. तेव्हा ती कलाकृती ही त्यांच्या नावांनी ओळखली जाते. कारण लेखकांची ती कलाकृती म्हणजे दुसरे अपत्यच असते. कलावंत त्या कलाकृतीमध्ये आपला जीव ओतत असतो. म्हणून एखादी कलाकृती वाचत असताना आपणाला त्या त्या लेखकांचे प्रतिबिंब त्या कलाकृतीत आढळते. म्हणूनच वा. ल. कुलकर्णी म्हणतात की, 'ललित वाङ्मय' हे व्यक्तिनिष्ठ असते. पुढे ते म्हणतात, 'काव्यात भावना व कल्पना या प्रतिभानिर्मित असल्यामुळे पाहिजेत तरच सौंदर्याची निर्मिती

Scanned with OKEN Scanner

स्पष्ट करतात. तेव्हा त्या कवितेतून वेगवेगळा प्रयत्न करीत असतो. परंतु शास्त्रीय वाङ्मयामध्ये असे घडत नाही. दोन अधिक दोन बरोबर चार असेच उत्तर अपेक्षित असते. त्याठिकाणी वाचकांना व अभ्यासकांना वेगळा संदर्भ देता येत नाही. परंतु ललित वाङ्मयात 'सात सक्कं त्रेचाळीस' असे होऊ शकते. याचाच अर्थ ललित वाङ्मय हे एकाच वेळी वेगवेगळे अर्थसंदर्भ सूचित करीत असते. म्हणूनच अनेकार्थता हा ललित वाङ्मयाचा महत्त्वाचा गुण आहे.

ललित वाङ्मयाची भाषा ही शास्त्रीय साहित्याच्या भाषेपेक्षा वेगळी असते. ललित वाङ्मयाची भाषाही त्या लेखकाची तेथील परिसर व समाज जीवनाशी निगडीत असते. म्हणून ती आपलीशी वाटते. परंतु शास्त्रीय भाषेत नेमकेपणा व तार्किकता याला महत्त्व असते. त्यामुळे अनेकदा ती रूक्ष व अवघड वाटते. ललित वाङ्मयाच्या भाषेची परिणामकता हा गुण महत्त्वाचा ठरतो. तिला वाचकाच्या मनावर परिणाम करावयाचा असतो. वाचकांच्या मनपटलांवर संस्कार करून परिवर्तन घडवून आणावयाचे असते.

ललित वाङ्मयात वाच्यार्थाला महत्त्व राहत नाही तर ध्वन्यार्थाला महत्त्व असते. परंतु शास्त्रीय साहित्यात व्यंगार्थ महत्त्वाचे नसून तेथे वाच्यार्थ महत्त्वाचा असतो. जसे 'दारावरून हाती गेला' म्हणजे दारावरून असा अर्थ न घेता दारासमोरून हाती गेला असा अर्थ येथे अपेक्षित असतो. 'सूर्य अस्ताला जाणे' हे त्याचे साधे विधान आहे. परंतु रसिक, वाचक त्या विधानाचा आपापल्या परीने अर्थ घेतात. शेतकऱ्यांना वाटते की, आता सूर्यास्त होतो आहे. औत सोडायला पाहिजे. त[...] एखाद्या चोरी करणाऱ्या चोराला वाटते की, आता संध्याकाळ होते आहे. आप[...] आपल्या कामाला लागलं पाहिजेत. तर याच विधानाचा अर्थ घरात असलेली गृहि[...] वेगळा घेईल ते म्हणेल की, सूर्य मावळतो आहे आता धनी घरी येतील आ[...]

स्वंयपाक करून ठेवावा. असे एकाच विधानाचे भिन्न - भिन्न अर्थ जेव्हा निघतात तेव्हा तेथे वाच्यार्थ नसतो. तर ध्वन्यार्थ असतो. म्हणून ललित वाङ्मय हे ध्वन्यार्थाने युक्त असते. म्हणूनच रसिक, वाचक, अभ्यासक व समीक्षक त्या साहित्याचा आपापल्या परीने अर्थ घेऊन रसास्वाद घेत असतात.

ललित वाङ्मय आणि शास्त्रीय साहित्य याचे वर्गीकरण प्राचीन संस्कृत मीमांसक राजशेखर यांनी अतिशय मार्मिकरित्या केले आहे. त्यांनी साहित्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. १) वस्तु निबंधन २) प्रतिभास निबंधन. वस्तु निबंधन म्हणजे एखाद्या गोष्टीचे यथार्थ वर्णन करणे म्हणजे वस्तुनिबंधन होय. तर या प्रकाराचे लेखन शास्त्रीय साहित्यात होत असते. तेव्हा प्रतिभास निबंधन म्हणजे एखाद्या गोष्टीचे यथार्थ वर्णन न करता त्यात कवींच्या चमत्कृतीपूर्ण प्रतीतीला महत्त्व असते. याचाच अर्थ शास्त्रीय वाङ्मयात एखाद्या वस्तूचे जसेच्या तसे वर्णन आलेले असते. तर ललित वाङ्मयात वस्तूचे जसेच्या तसे वर्णन न येता त्या वस्तूला एक नवे रूप प्राप्त झालेले असते. उदाहरणादाखल पहावयाचे झाल्यास एक शास्त्रज्ञ व कवी एका बागेत फिरायला गेले असता एका बागेतील एका डूलणाऱ्या गुलाबाच्या फुलांकडे पाहुन दोघांची प्रतिक्रिया ही वेगवेगळी निघेल. शास्त्रज्ञ म्हणेल की, ती वाऱ्याने डूलती आहे व त्याची वाढ होते आहे, याचाच अर्थ ती सजीव वनस्पती आहे. असा अर्थ तो शास्त्रज्ञ काढेल. परंतु सोबत असणाऱ्या कवीला ती डुलणारी कळी ही कळी न वाटता ती 'फुलराणी' वाटते. येथे कवीची चमत्कृतीपूर्ण प्रतीती पाहावयास मिळते. यावरून असे लक्षात येईल की, वस्तूनिबंधन म्हणजे शास्त्रीय साहित्य व प्रतिभास निबंधन म्हणजे ललित वाङ्मय होय.

ललित साहित्यात काव्य, कथा, कादंबरी, नाटक असे विविध लेखनप्रकार दिसून येतात. त्या लेखन प्रकारातही वेगवेगळे उपप्रकार जाणवतात. उदा. काव्यामध्ये

महाकाव्य, खंडकाव्य, आख्यानकाव्य असे लेखन प्रकार जाणवतात. परंतु ललितेत्तर साहित्यात असे लेखन प्रकार नसतात. त्यात निबंधपर आणि दीर्घ ग्रंथपर असे दोनच प्रकारचे लेखन दिसून येते.

ललित वाङ्मय हे व्यक्तिसापेक्ष किंवा लेखक सापेक्ष असते. तर ललितेत्तर साहित्य हे लेखक सापेक्ष नसते. ते फक्त विषय सापेक्ष असते.

ललित साहित्यात आशय आणि अभिव्यक्ती यात अद्वैत असते. तर ललितेत्तर साहित्यात आशय आणि अभिव्यक्ती यात द्वैत असल्याचे जाणवते.

ललित वाङ्मय हे एका व्यक्तिमनाला भावलेल्या कलात्मक सत्याचा आविष्कार असते. त्यात घाटाला महत्त्वाचे स्थान असते. म्हणून प्रभाकर पाध्ये ललित कलाकृतीच्या रचनेला 'रूपबंध' असे संबोधतात. तर ललितेत्तर वाङ्मयाचा हेतू हा एखाद्या नव्या ज्ञानात्मक अनुभव-सत्याचा आविष्कार एवढाच असतो. त्यामुळे हे लेखन यांत्रिक बनते.

ललित वाङ्मयातील सत्य हे कलात्मक सत्य असते ते काळाच्या ओघात टिकून राहते. त्यात परिवर्तन व बदल होत नाही. परंतु शास्त्रीय साहित्यातील सत्य हे परिवर्तनशील असते. काळाच्या ओघात त्यात बदल झाल्याचे जाणवते.

ललित साहित्यात सत्याभासाला महत्त्वाचे स्थान असते. तर शास्त्रीय साहित्यात सत्याला महत्त्व असते. तर रसिक, वाचकांना साहित्यातील सत्याभास आवडतो. उदा. एका व्यक्तीने स्वतःच्या आवाजात बोलणे याला जितके महत्त्व नाही. परंतु त्यात व्यक्तिची दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने त्यांच्याच आवाजात बोलणे याला महत्त्व असते. हेच तर ललित वाङ्मयात पहावयास मिळते.

अशा तऱ्हेचे ललित वाङ्मय हे वाचकांच्या भावनांना आव्हान करते. तर शास्त्रीय साहित्य हे वाचकांच्या विचारांना आव्हान करते. ललित वाङ्मय हे अमूर्ताला



Scanned with OKEN Scanner

मूर्त स्वरूप देण्याचे कार्य करते.

अगोचराला गोचर करण्याचे कार्य ललित वाङ्मय करते तर कधी न्यायाधीशांची भूमिका घेऊन न्यायदानाचे कार्य करते. कधी वाटाड्याची भूमिका घेऊन वाचकांना योग्य दिशा सूचविण्याचे कार्य करते. म्हणून ललित वाङ्मयाचे स्वरूप हे कल्पनेच्या सहाय्याने बांधलेला भावसत्याचा सौंदर्यपूर्ण आविष्कार असते.

**साहित्यातील संवेदनात्मकता :**

समाज जीवनात जीवन जगताना मानव भावनाशील असतो. परंतु सर्वच मानव संवेदनशील नसतात. लेखक हा संवेदनशील कृतीने अनुभव घेत असतो आणि आपल्या कवी व्यापाऱ्याने त्यात नाविन्य निर्माण करून रसिक मनात संक्रात करीत असतो. तोच कलावंत मोठा गणला जातो. कलावंत हा संवेदनशील असला पाहिजेत. उदा. बालकवी हे संवेदनशील कृतीचे कवी होते त्याचबरोबर इंदिरा संत यांच्या कवितेतही संवदेना पहावयास मिळते.

बा. सी. मर्ढेकर यांनी संवेदना जागृतीवर महत्त्वाचा लय सिध्दांत मांडून सौदर्यांची प्रतीती कशी होते हे सांगितले आहे. त्यांनी संवाद, विरोध आणि समतोल यांच्या संयोगाने सौंदर्याची निर्मिती होते. असे बा. सी. मर्ढेकर म्हणतात.

जेव्हा 'तम वेदना या. मम वेदना बनतात' तेव्हाच संवदेना जागृत होतात. म्हणजेच 'दुसऱ्याचे दुःख हे आपलेच दुःख' अशी आपली धारणा जेव्हा बनते तेव्हा माणूस संवेदनशील असतो. म्हणून संवेदनात्मकता या गुणाला साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे.

**साहित्यातील वास्तवता :**

साहित्य म्हणजे कल्पनेचा खेळ असे असले तरी साहित्यात वास्तवतेला महत्त्वाचे स्थान असते. जे साहित्य वास्तवाभिमूख असते. तेच साहित्य चिरकाल



Scanned with OKEN Scanner

टिकते. त्यालाच आपण अक्षर वाङ्मय म्हणून संबोधतो.

साहित्य ही एक व्यक्तिमनाची निर्मिती असून त्या कलाकृतीचा लेखक हा समाजाशी एकरूप असतो. समाजातील अनुभव तो घेतो. त्या अनुभवांना कल्पनेच्या सहाय्याने मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु याठिकाणी कलावंताला वास्तव सत्य नाकारता येत नाही. म्हणून वास्तव जीवनाचा अनुभव देणारे साहित्य हेच खरे साहित्य असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

साहित्याचे स्वरूप हे पूर्णपणे कल्पित नसते. त्याला वास्तवाचा आधार घ्यावा लागतो. या ठिकाणी मॅथ्यू ॲर्नाल्ड यांनी केलेला निर्देश महत्त्वाचा ठरतो. ते म्हणतात की, 'साहित्य म्हणजे जीवनभाष्य'[५] अशी साहित्याची व्याख्या केली आहे. त्यात त्यांनी साहित्य आणि वास्तव जीवन यांचा संबंध स्पष्ट केला आहे. यावरून असे सांगता येईल की, साहित्यात वास्तव लेखनाला महत्त्वाचे स्थान असते. १९६० नंतरचे साहित्यात वास्तवता जास्त प्रमाणात पहावयास मिळते.

**साहित्यातील कल्पकता :**

साहित्यामध्ये जसे वास्तवाला महत्त्व आहे. तसे कल्पनेला महत्त्व आहे. साहित्यिकाकडे कल्पना असल्याशिवाय साहित्याची निर्मिती होत नाही. कारण ललित साहित्याचे स्वरूप हे कल्पनेने साधलेले एक आत्मिक आविष्कार असते. कवी जेव्हा समाजातील वास्तव सत्य स्वीकारतो. तेथील समाज जीवन अनुभवतो तेव्हा त्या अनुभवाला कल्पनेच्या सहाय्याने व आपल्या प्रतिभा निर्मित शक्तीने नवे रूप देण्याचा प्रयत्न करीत असते.

कवी लौकिक जीवनाला अलौकिक बनविण्याचा प्रयत्न कल्पनेमुळेच करू शकतो. कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन आकाशाला गरूडाप्रमाणे गवसणी घालण्याचे काम कवी करीत असतो.



Scanned with OKEN Scanner

साहित्य हे पूर्णपणे कल्पित आहे, असे नाही तर त्याला वास्तवाची जोड असते. दैनंदिन जीवनातील वास्तविक सत्य कवी आपल्या कल्पनेने तो साहित्यात मांडत असतो. तेव्हा त्यास नवे रूप प्राप्त झालेले असते. त्यालाच अपण प्रतिभासनिबंधन असे म्हणतो. शास्त्रीय साहित्यात सत्याला महत्व असते तर ललित वाङ्मयात सत्याभासाला महत्त्व असते. म्हणून साहित्यात कल्पकतेला महत्त्वाचे स्थान आहे.

**साहित्यातील भावनात्मकता :-**

साहित्यामध्ये जशी कल्पना महत्त्वाची आहे. तसे भावनेलाही महत्वाचे स्थान आहे. ललित साहित्यात दैनंदिन जीवन जगताना ज्या भावना आपण व्यक्त करतो. त्याला महत्त्व नसते. तर भावनात्मक अनुभूतीला महत्त्व असते. हे प्रथमतः लक्षात घेणे गरजेचे आहे. भावनेचा सहजोद्रेक म्हणजे काव्य अशी भूमिका वर्डस्वर्थ यांनी मांडली. म्हणून भावना या गुणविशेषाला काव्यात महत्त्वाचे स्थान आहे. ललित साहित्याच्या संसाराचा आधारस्तंभ म्हणून भावनाविलासाकडे पाहिले जाते. भावनाप्रधान कवी म्हणून भा. रा. तांबे यांचा उल्लेख आपल्या मराठी विश्वात आहे.

**साहित्यातील अनुभव :-**

ललित साहित्यात अनुभवाला महत्त्व असते. तसे ललितेत्तर साहित्य आणि ललित साहित्य यातून व्यक्त होणारा अनुभव हा वेगवेगळा असतो. शास्त्रीय साहित्यातील अनुभव हा व्यक्तीनिरपेक्ष असतो. तर ललित वाङ्मयातील अनुभव हा व्यक्तिसापेक्ष व लेखक सापेक्ष असतो. कारण ललित कलाकृती ही एका व्यक्तिमनाने साधलेली कलाकृती असते. म्हणून लेखक सापेक्षता हा ललित वाङ्मयाचा महत्त्वाचा गुण आहे. ललित साहित्यात भावनात्मक अनुभूतीला महत्त्व असते. तर शास्त्रीय साहित्यात वैचारिक अनुभवाला महत्त्व असते. ललितेत्तर साहित्यातील अनुभव हा एकेरी स्वरूपाचा असतो. तर ललित वाङ्मयातील अनुभव द्विपदात्मक असतो.

**साहित्यातील सूचकता :-**

सूचकतेला ललित वाङ्मयात महत्त्वाचे स्थान आहे. ललितेत्तर साहित्यात त्याचे स्थान गौण आहे. काव्यात एखादी गोष्ट पूर्णपणे स्पष्ट करून सांगण्यापेक्षा ती सूचविली जाते. सूचविणे हा काव्याचा मूलभूत गुणधर्म आहे. ललित साहित्यातील कलाकृतीचे जे अनेक अर्थ स्पष्ट होतात ते सूचकता या गुणवैशिष्टयामुळेच म्हणून काव्यात सूचकतेला महत्त्व आहे.

कवीचा अनुभव प्रदीर्घ असतो. त्या अनुभवाला साहित्यात व्यक्त करीत असताना सूचकतेमुळेच त्या साहित्यकृतीला सौंदर्यता प्राप्त होते. कारण सूचकता ही त्या अनुभवाला आकर्षक बनविते. उदा. मराठीतील कवी विनायक यांच्या कवितेतील अनुभव हा सूचक अनुभव आहे.

एखादी कलाकृती एखाद्या व्यक्तिकडून अनेकदा वाचली असता त्या कलाकृतीचा प्रत्येकवेळी वेगळाच अर्थ निघत असतो. या मागील कारण म्हणजेच सूचकतेचे सामर्थ्य हेच होय. उदा. औदुंबर ही कविता होय किंवा रणांगण ही कादंबरी. ही सूचकता कलावंताच्या कलात्मक अनुभवाचा विशेष असते. सूचकतेमुळेच काव्यात सौंदर्याची प्राप्ती होते. साहित्याला अनेकार्थता हा गुण सूचकतेमुळेच प्राप्त झाला आहे.

**साहित्यातील सेंद्रीयत्व :-**

सर्वप्रथम ॲरिस्टॉटलने कलाकृतीच्या सेंद्रीयत्वाची कल्पना मांडली. हेगेल या सौंदर्यशास्त्रज्ञाने सेंद्रीयत्वाबद्दल असे म्हटले आहे की, 'अनेकात्वातून होणारी एकत्वाची प्रतीती'[४] म्हणजेच साहित्यानुभवात असणाऱ्या भिन्न भिन्न घटकांचा एकात्म संस्कार इथे अभिप्रेत आहे.

सेंद्रीयत्वाला इंग्रजीत Organic Unity असे म्हणतात. म्हणजेच याचा

अर्थ सुव्यवस्थीत संघटना असा आहे. ज्याप्रमाणे कान, नाक, डोळे, हात, पाय अनेकविध अवयवांच्या संघटनमुळे मानवी शरीराची निर्मिती होते. तसेच साहित्यातील अनेक घटकांचे एकत्रीकरण होऊन एक कलाकृती तयार होते. त्यालाच सेंद्रीय असे म्हणतात. ती सर्व घटक स्वंयपूर्ण असली तरी त्याचे कलाकृतीमध्ये समाविष्ट झालेले असतात. म्हणूनच त्या कलाकृतीचा वाचकांवर रसिकांवर परिणाम होतो याचाच अर्थ ललित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव हा चैतन्यमय, जिवंत हवा आणि अंतर्बाह्य सुसंघटित हवा तरच ती कलाकृती आस्वादकांवर योग्य संस्कार करेल.

**साहित्याची विश्वात्मकता :-**

साहित्याचे लेखन हे विश्वात्मक असायला हवे. जेव्हा एखादा कलावंत एखादी कलाकृती निर्माण करतो. अशावेळी ती कलाकृती त्या लेखकांपूरती मर्यादित न राहता ती जेव्हा सर्वांची बनते तेव्हा ती कलाकृती विश्वात्मक पातळीवर पोहचते. उदा. संताचे साहित्य.

संताच्या साहित्यातून जाणवणारा अनुभव हा संतापूरता मर्यादित न राहता तो अनुभव सर्वसामान्याचा बनतो तेव्हा त्यास वैश्विक अनुभव असे म्हणतात. संत ज्ञानेश्वर यांनी 'हे विश्वचि माझे घर' असे सांगून विश्वालाच घर संबोधले. यावरून संताची साहित्यातील विश्वात्मकता लक्षात येते.